मा.न्यायालयीन निर्णयानुसार धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम, व नागपूर या ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत ३३ पंचायत समित्यांमधील रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणुकांचा कार्यक्रम..

# राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
दिनांक : १३ सप्टेंबर, २०२१

प्रति,
जिल्हाधिकारी
धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर

<u>विषय:</u> मा.न्यायालयीन निर्णयानुसार धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर या ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणाऱ्या ३३ पंचायत समित्यांमधील रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणुकांचा निवडणूक कार्यक्रम...

<u>संदर्भ:</u> १) मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.९८०/२०१९ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०४ मार्च,२०२१ रोजी दिलेला निर्णय.
२) आयोगाची समक्रमाकांची दि. १७ मार्च, २०२१ रोजीची पत्रे.
३) मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ३३८/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि. २२ मार्च,२०२१ रोजी दिलेला निर्णय,
४) मा. सर्वोच्च न्यायालयाने संकिर्ण अर्ज क्र. ६५९/२०२१ व इतर संलग्न इंटरवेंशन अर्जांमध्ये दि. ३० एप्रिल, २०२१ रोजी दिलेला निर्णय.
५) मा. सर्वोच्च न्यायालयाने पुनर्विलोकन याचिका क्र. ६७६२ (डायरी)/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि. ४ मे,२०२१ रोजी दिलेला निर्णय.
६) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २२ जून,२०२१ चा निवडणुक कार्यक्रम
७) आयोगाचे समक्रमाकांचे दिनांक ०९/०७/२०२१ चे पत्र
८) मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ९८०/२०१९ मध्ये सलंग्न संकीर्ण अर्ज क्र.९०२/२०२१ मधील दिनांक ०९/०९/२०२१ रोजीचा निर्णय.

महोदय,

मा. सर्वोच्च न्यायालयाचे संदर्भांकित अनु.क्र. १ येथील दिनांक ०४/०३/२०२१ रोजीच्या निर्देशानुसार धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम, नागपूर या ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत ३३ पंचायत

समित्यांमधील नागरिकांच्या मागासप्रवर्गातील सदस्यांची पदे रद्द केल्यामुळे रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणुकांचा कार्यक्रम दिनांक २२ जून,२०२१ रोजी निर्गमित केला. त्यानुसार दिनांक ०६/०७/२०२१ रोजी छाननीची प्रक्रिया पुर्ण झाली असून वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली.

मा. सर्वोच्च न्यायालयात संकीर्ण अर्ज क्रमांक ९०२/२०२१ मधील दिनांक ०७/०७/२०२१ रोजी झालेल्या सुनावणीत आयोगाने पोट निवडणूकीच्या मतदार संघात अनुकूल परिस्थिती असल्यास व तेथे प्रतिबंधात्मक आदेश तसेच लॉकडाऊनचे आदेश नसल्यास निवडणूक कार्यक्रम पुढे चालू ठेवता येईल व संबंधित पोट निवडणूक क्षेत्रात कोवीड-१९ बाबत प्रोटोकॉल तंतोतंत पाळले जातील असे निरीक्षण नोंदवून त्याबाबतचा अनुपालन अहवाल दोन महिन्यात सादर करण्याचे निदेश दिले. तथापि, कोरोना संक्रमणाचा वाढता धोका तसेच नविन डेल्टा व्हेरिएंटचा धोका विचारात घेऊन संपूर्ण राज्यभर स्तर-३ चे निर्बंध लागू केले असल्याने सदर पोटनिवडणुका पुढे ढकलण्याबाबत मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०७/०७/२०२१ च्या पत्रान्वये विनंती केली. त्यास अनुसरुन मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग व प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन यांच्यासोबत दिनांक ०८/०७/२०२१ रोजी बैठक घेतली. या बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे संबंधित जिल्हाधिकारी यांचे अहवाल व इतर बाबी विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ०९/०७/२०२१ च्या पत्रान्वये सदर निवडणुकांची पुढील प्रक्रिया आहे त्या टप्प्यावर (वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द) स्थगित केली.

२. उक्त प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक ०९/०९/२०२१ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये राज्य शासनाचे कोवीड-१९ संदर्भातील सुधारित ब्रेक द चेन आदेश दिनांक ११/०८/२०२१ रोजीचे निर्बंध पोट निवडणुकीसाठी लागू होत नसल्याचा निर्णय देत सदरचा पोट निवडणूक कार्यक्रम पुढे चालु ठेवण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने तात्काळ निर्णय घेण्याबाबत आदेश दिले आहेत.

३. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील दिनांक १२/०९/२०२१ रोजीचे वार्तापत्र तसेच जिल्हाधिकारी, धुळे,नंदुरबार,अकोला, वाशिम व नागपूर यांचेकडील कोरोना रुग्णसंख्येबाबतच्या अहवालानुसार संबंधित क्षेत्रात कोराना रुग्णसंख्या नगण्य असल्याचे दिसून येते.

४. सदर वस्तुस्थिती विचारात घेता आता दिनांक ०९/०७/२०२१ च्या पत्रान्वये स्थगित केलेल्या पाच जिल्हा परिषदा मधील ७० निवडणूक विभाग व ३३ पंचायत समित्यांमधील १३० निर्वाचक गणातील रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी परिशिष्ट - १ मध्ये दिलेला निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

५. सदर निवडणुकीची आचारसंहिता आजपासून पुनश्च लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. तसेच निवडणूक प्रचार सभेकरिता जास्तीत जास्त ५० व्यक्तींच्या उपस्थितीस परवानगी देण्यात यावी. उक्त पोट निवडणूकांच्या संदर्भात यापुर्वी आयोगाचे दिनांक २२/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र-परिशिष्ट-१

प्रत :-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
४) अपर मुख्य सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ,मुंबई-१
५) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) विभागीय आयुक्त, नाशिक, अमरावती व नागपूर
८) जिल्हा पोलिस अधिक्षक, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर
९) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई-४
१०) सहाय्यक आयुक्त (संगणकीकरण कक्ष), राज्य निवडणूक आयोग, मुंबई
११) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१२) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
१३) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने
१४) निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-
रानिआ/जिपपंस/२०२१/प्र.क्र.५/का.७,
दिनांक १३ /०९/२०२१ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट-१

## धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर या ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणाऱ्या ३३ पंचायत समित्यांमधील रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणुकांचा निवडणूक कार्यक्रम

| क्र. | कार्यक्रमाचा तपशिल | कार्यक्रमांचा दिनांक |
|---|---|---|
| १ | वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार, २१ सप्टेंबर, २०२१ |
| २ | नामनिर्देशनपत्राचा स्विकार करण्याबाबत किंवा ते नामंजूर करण्याबाबतचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुध्द जिल्हा न्यायाधिशांकडे अपिल करण्याची शेवटची तारीख | शुक्रवार, २४ सप्टेंबर,२०२१ |
| ३ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिलावर सुनावणी व निकाल देण्याची संभाव्य शेवटची तारीख | सोमवार, २७ सप्टेंबर, २०२१ |
| ४ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिल निकालात काढल्यावर वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | सोमवार, २७ सप्टेंबर, २०२१ |
| ५ | उमेदवारी मागे घेणे<br>(अ) जेथे अपील नाही तेथे | सोमवार, २७ सप्टेंबर, २०२१<br>(सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) |
| | (ब) जेथे अपील आहे तेथे | बुधवार, २९ सप्टेंबर, २०२१<br>(सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) |
| ६ | निवडणूका लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप-<br>(अ जेथे अपील नाही तेथे | सोमवार, २७ सप्टेंबर, २०२१<br>( दुपारी ३.३० नंतर) |
| | (ब) जेथे अपिल आहे तेथे | बुधवार, २९ सप्टेंबर, २०२१<br>( दुपारी ३.३० नंतर) |
| ७ | मतदानाची तारीख | मंगळवार ०५ ऑक्टोबर, २०२१<br>(सकाळी ७.३० ते ५.३० पर्यंत) |
| ८ | मतमोजणी तारीख | बुधवार ०६ ऑक्टोबर, २०२१<br>(सकाळी १०.०० पासून) |
| ९ | निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करणे | शुक्रवार, ०८ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत |

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\Tendulkar\सुप्रिया\सन २०२१\PALGHER PROGRAM & ५ ZPPS\५ ZP & ३३ PS SUDJARIT PROGRAM.docx